# ३४ लाखांचा हिरा चोरणाऱ्या २ चिनी नागरिकांना अटक

**मुंबई, दि. १ - आंतरराष्ट्रीय पातळीवर भरवण्यात आलेल्या ज्वेलरी शोमधून ३४ लाख रुपयांचे हिरे चोरणाऱ्या २ चिनी नागरिकांना वनराई पोलिसांनी मोठ्या शिताफीने मुंबईतळावर पकडले. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आज सकाळी दोघांना अटक केली. प्रतिष्ठेचा ठरलेल्या गुन्ह्याचा छडा लावण्यात वनराई पोलिसांची भूमिका महत्त्वाची ठरली.**



गोरेगाव परिसरातील नेस्को एक्झिबिशन सेंटरमध्ये २७ जुलै रोजी आंतरराष्ट्रीय पातळीवर ज्वेलरी शोचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. ३ दिवसीय असलेल्या या 'ज्वेलरी शो'ला जगभरातून लोकांनी हजारो लोक भेट देत होते. शेवटच्या दिवशी अर्थात ३१ जुलै रोजी ज्वेलरी शोमध्ये स्टॉल लावणाऱ्याने ५.४३ कॅरेटचा ३४ लाख रुपयांचा हिरा चोरीला गेल्याची तक्रार वनराई पोलिसांकडे केली. जागतिक पातळीवर भरवण्यात आलेल्या 'ज्वेलरी शो'मधून हिरा चोरीला जाणे हा मुंबई पोलिसांसाठी प्रतिष्ठेचा प्रश्न होता. त्यामुळे उत्तर प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त राजेश प्रधान यांनी त्वरित हिरा चोरणाऱ्यांना अटक करण्याचे आदेश दिले. त्यानुसार परिमंडळ - १२ चे पोलीस उपायुक्त डॉ. विनयकुमार राठोड व सहाय्यक पोलीस आयुक्त ज्ञानेश्वर जवळकर, वनराई पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्योत्स्ना रासम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचे एक पथक नेमण्यात आले.

तपासादरम्यान, पोलीस पथकाने 'ज्वेलरी शो'ला भेटणाऱ्या लोकांची व ज्वेलरी शोमध्ये स्टॉल लावणाऱ्यांची माहिती पोलिसांनी गोळा केली. तसेच सीसीटीव्ही फुटेज तपासले. सीसीटीव्ही फुटेजमध्ये २ चिनी नागरिकांच्या संशयास्पद हालचालींवर वनराई पोलिसांना संशय आला. पोलिसांनी त्या दोन्ही नागरिकांची माहिती सीआयएसएफ पथकाकडून मिळवली. त्या दोन्ही नागरिकांच्या पासपोर्टची माहिती पोलिसांना मिळाली. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तात्काळ छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाशी संपर्क साधला असता, दोन्ही चिनी नागरिक चीनला जाण्याच्या तयारीत होते. ही माहिती मिळताच वनराई पोलिसांनी विमानतळ गाठले. काल सायंकाळच्या सुमारास त्या दोन्ही चिनी नागरिकांना ताब्यात घेतले. रात्रभर त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी हिरा चोरल्याची कबुली देऊन सदर हिरा [illegible] लपवल्याचे पोलिसांना सांगितले. या प्रकरणी वनराई पोलिसांनी (गु. र. क्र. १५८/१७) भादंवि कलम ३७९, ४२०, ३४ नुसार गुन्हा दाखल करून चिनी नागरिक चियांग किंग व ट्रेंग झियाबो यांना अटक केली.

प्रतिष्ठेचा प्रश्न ठरलेल्या गुन्ह्याचा तपास उत्तर प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त राजेश प्रधान, परिमंडळ - १२ चे उपायुक्त डॉ. विनयकुमार राठोड, सहाय्यक पोलीस आयुक्त ज्ञानेश्वर जवळकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्योत्स्ना रासम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महादेव निंबाळकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत घोणे, पोलीस उपनिरीक्षक मांगुर्डे, सुरवसे, राठोड, मस्के, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे हवालदार मुरलीधर कारंडे, पोलीस प्रवीण मोरे, विश्वजित खामकर, राजेंद्र काळे, पोलीस कैलास मोरे, पांडरा, देशमुख, सावंत, सागर पवार, पाटील आदी पथकाने उघडकीस केला.

वार्ताहर
बुधवार, २ ऑगस्ट २०१७